**मा.श्री.एस.एस.गुंजाळ, अपर जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३.०६.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )**

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन .त्यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सभेत खालील प्रमाणे विषय निहाय चर्चा झाली.

| अ.क्र. | विषय | अनुपालन | |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक ०९.०३.२०११ रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | दि.०९.०३.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. १४२१ ते १४६८ दिनांक २९.०३.२०११ नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | धुळे मऔविम क्षेत्रातील मुलभुत सुविधा – पाणी, रस्ते, पथदिवे इ. बाबत - सर्व औ.संघटना | नविन उच्चस्तरीय जलकुंभ बांधण्याचा रु. १ कोटीच्या प्रस्तावास व रस्ते दुरुस्ती प्रशासकीय मान्यता मिळाली असुन तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. रस्ते दुरुस्ती व पथदिवे दुरुस्तीचे काम काही झोनमध्ये पुर्ण झाले असुन उर्वरीत सुरु आहे. पाणीपुरवठ्यासाठी असलेला विजपुरवठा जोडणी आता मऔविमच्या औद्योगिक फिडर वरुन केली असल्यामुळे यापुढे अडचण येणार नाही. पाईपलाईनच्या टेंडरचा प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर अंतिम मंजुरीसाठी सादर केले असल्याचे का.अ. मऔविम धुळे यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने क्षेत्रातील खराब रस्त्यांची डागडुजी दिनांक १४.०६.२०११ पासुन सुरु करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | का.अ. मऔविम धुळे |
| २ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले मुखंड, त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेले भुखंड परत घेणे बाबत – श्री नितीन बंग, मु.प्र. खांदेश औ.विकास परिषद | आता पर्यंत ७ मुखंडावर कार्यवाही पुर्ण झालेली आहे तसेच नविन ४८ मुखंड नव्याने उपलब्ध होत असुन जवळ जवळ १५० मुखंडाची मागणी (वेटींग) असुन भुखंड परत घेण्यासाठी वेळ लागत असल्याचे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रा.अ. मऔविम यांनी जुलै ११ च्या पहिल्या आठवड्यांत बैठकीचे आयोजन करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघु उद्योग भारती | नविन लेआवुटला मंजुरी मिळाली असुन अतिक्रमण धारकांची यादी मऔविमने सर्व औ.संघटनांना देवुन त्यातुन जुन्या अतिक्रमण धारकांना प्रथम मुखंड देणेसाठी प्राधान्य देणेसाठी मऔविमने औ. संघटनांच्या मदतीने यादी अंतिम करुन पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन मुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | मऔविम क्षेत्रा शेजारील १०० हेक्टर क्षेत्रामध्ये शासनाची व खाजगी जमीन किती आहे याची मोजणी करणेसाठी रुपये ६.३९ लक्ष रुपये मोजणी फी लागणार असुन यापुर्वीच्या सभेमध्ये ठरल्यानुसार ती मऔविम भरण्यास तयार असुन तसा प्रस्ताव मऔविमने वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर केला असुन लवकरच निधी उपलब्ध होणार असल्याचे प्रा.अ.मऔविम यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन निधी उपलब्ध झालेनंतर तात्काळ कार्यवाही सुरु करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा.अ. मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाक्यामुळे होत असलेल्या वाहतुकीच्या अडथळया बाबत – डामा धुळे | इतर शहरांप्रमाणे जकात नाका व वाहतुकीचे नियोजन करणेसाठी नगररचना विभागाकडुन भुसंपादन प्रस्ताव मागवला असुन त्यास विलंब लागणार असल्याने तात्पुरती सोय करणेसाठी मनपाकडुन अहवाल मागीतला होता, सभेत महानगर पालिकेचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. सविस्तर चर्चा होवुन नाक्यावरील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी आयुक्त महानगरपालिका यांनी सर्व औ.संघटना यांची मा.अध्यक्ष यांचे कार्यालयात तात्काळ सभा आयोजीत करणे बाबत व तसेच यापुढे आयुक्त किंवा उपआयुक्त सदर सभेस नियमत उपस्थित राहणेसाठी आयुक्त मनपा यांना सुचीत करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | आयुक्त मनपा धुळे |
| ६ | नरडाणा ग्रोथ सेंटर मध्ये नविन पाईपलाईन टाकुन पाणी उपलब्ध करुन देणे व अविकसीत भुखंड ताब्यातत घेणे बाबत - मा. आमदार श्री.जयकुमार रावत | पाईपलाईन टाकणेचे काम ६५ टक्के पुर्ण झालेले असुन सध्या २ बोअर घेतले असुन १५ दिवसांत पाण्याची व्यवस्था करणेत येईल असे का.अ.अभियंता यांनी सांगितले. सदर क्षेत्रात व्हर्टेक्स कंपनीला साधारणतः २००८ साली भुखंड वाटप झालेले असुन त्यांना भुखंडाचा विकास करण्याची मुदत २०१३ पर्यंत असल्याने सध्या भुखंड परत घेण्याची कार्यवाही करता येत नाही. मुदत संपल्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | काअ प्राअ मऔविम धुळे |
| ७ | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात सुविधा मिळणे बाबत व ईएसआयचा फायदा घेतलेल्या सभासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- श्री नितीन बंग,मु.प्र.- खांदेश औद्योगिक विकास परिषद | औद्योगिक संघटनांच्या अडचणी सोडवण्यासाठी दिनांक १७.०६.२०११ दुपारी ३ वाजता ईएसआय कार्यालयाने मऔविम क्षेत्रात सभा आयोजीत करण्याचे चर्चेअंती ठरले. सभेस सीव्हील हॉस्पीटलचे डीन यांना सुध्दा बोलवण्यांत यावे. सभेत झालेल्या चर्चेचा सविस्तर अहवाल मा.अध्यक्ष यांना सादर करणे बाबत सुचीत करण्यांत आले. तसेच मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यातील रिक्त पदे तात्काळ भरणेसाठी मंजुर व रिक्त पदे तसेच भरावयाचे पदे या बाबत सविस्तर पत्र ईएसआयने मा.अध्यक्ष यांना सादर करावे. असेही सुचीत करण्यांत आले. | ईएसआय धुळे |
| ८ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – घटका समोरील अतिक्रमणा बाबत | सदर भुखंडासमोरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी, याबाबत का.अ. अभियंता सांगितले की, मा.पोलीस अधिक्षक यांचेकडे संरक्षणासाठी पोलीस कुमक मागवली होती, परंतु ती न मिळाल्याने अतिक्रमण काढता आले नाही. असे का.अ. मऔविम यांनी सांगितले. अतिक्रमण काढणे साठी नविन पोलीस अधिक्षक यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधावा तसेच या कामी औ.संघटनांची सुध्दा मदत घ्यावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | का अ मऔविम धुळे |
| ९ | ए-१० भुखंडावरील अतिक्रमण काढुन भुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत - अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे | | |
| १० | मे गंगेश्वर हॅचरीज अँड बिडींग फार्म प्रा.लि. मोराणे प्र.नेर यांना विजपुरवठा औद्योगिक नियमाप्रमाणे मिळणे बाबत | उद्योग घटकाची अडचण महावितरण कंपनीने सोडवली असल्यामुळे सदरचा विषय वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. | अ.अ. महावितरण धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मऔविम क्षेत्रातील विजबिले वेळेवर मिळणे बाबत - सर्व संघटना | सध्या महावितरण कंपनी खाजगी लोकांकडुन विज बिल वितरणाचे काम करत असुन सदर बिले वेळेवर उद्योजकांना मिळत नसल्यामुळे उशिरामुळे नाहक दंड भरावा लागतो. तसेच पेमेंट जमा करणेसाठी कॅश पेमेंट पेक्षा ऑनलाईन पेमेंट जमा करण्यास अडचणी येत असल्याचे संघटनाचे प्रतिनिधींनी सांगितले. या बाबत योग्य त्या सुचना सबंधीतांना देण्यांत आल्या असुन लवकरच एसएमएसव्दारे पेमेंट जमा करण्याची सुविधा सुरु करण्यँत येणार असल्याचे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. तसेच मऔविम क्षेत्रात व्होल्टेज कमी जास्त होत असल्याने विद्युत मोटारींचे नुकसान मोठया प्रमँणात होत असल्याचे संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले. सदर बाब तांत्रिक असुन लवकरच त्यावर उपाय योजना करण्यांत येईल असे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. | अअ महावितरण |
| १२ | मे.समता किचन एमआयडीसी धुळे या घटकाच्या भुखंड मदतवाढी बाबत एमआयडी सीकडुन हात असलेल्या त्रासा बाबत- श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | सदर उद्योजकाच्या सर्व अडचणी मऔविमकडुन सोडवण्यांत आल्या असल्याने विषय वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. | |
| १३ | मे.मयुरेश प्लास्टिक - ओटीएस योजने अंतर्गत सवलती मिळणे बाबत - श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | लवकरच नविन उद्योग धोरण शासन जाहीर करणार असुन त्यात ओटीएस योजनेचा समावेश होण्याची शक्यता असल्यामुळे सध्यस्थितीत विषय कामकाजातुन वगळण्यांत यावा असे वाटते. | |
| १४ | मे.ओमशांती ग्रुप साठी एक्सप्रेस फिडर वरुन मिळत असलेला विज पुरवठा पुर्ण दाबाने व नियमत होणे बाबत श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | ओमशांती ग्रुपसाठी त्यांनी २५.०० लक्ष रुपये भरुन स्वतंत्र फिडर घेतले आहे. त्यांना २४ तास विज नियमत मिळवुन देणेसाठी अमळनेर विभागातुन विज उपलब्ध करुन देण्यांत येत असुन भविष्यँत त्यांना विज टंचाईची अडचण येणार नाही अशा दृष्टिने नियोजन केलेले असल्याचे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. | अ.अ. महावितरण धुळे |
| १५ | मऔविम क्षेत्रातील प्रदुषीत पाणी मिचरा मऔविमच्या तलावँत होत असुन तो सर्वाच्या आरोग्यास धोकादायक आहे - श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | सांडपाणी व प्रदुषित पाणी हे महामंडळाच्या तलावात जात असते. त्यामुळे क्षेत्रातील उद्योजकांच्या व कामगारांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. या बाबत प्रदुषण मंडळाचे प्रतिनिधींनी अद्याप पाण्याची तपासणी केली नसल्याचे सभागृहास सांगितले. या बाबत सबंधीतांनी पाण्याचे नमुने घेवुन तपासणी अहवाल सादर करावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | म.प्रदुषण नियंत्रण मंडळ जळगांव |
| १६ | ई सेक्टर मधील ॲमिनीटी भुखंडावर उद्योग सुरु करणे बाबत - श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | ई सेक्टर मध्ये ॲमिनीटी साठी राखीव भुखंड उत्पादनासाठी ४ घटकांना दिलेले असुन त्यापैकी एक घटकाचे उत्पादन सुरु झालेले आहे, इतर ३ घटकांच्या भुखंड विकासाची मदत महामंडळाने ठरवुन दिलेल्या निकषांनुसार २०१५ पर्यंत असल्याचे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले. तो पर्यंत सदर विषय वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. | प्रा अ मऔविम |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | मे.प्रकाश इंडस्ट्रीज यांच्या दोन भुखंड एकत्रीकरण करण्यास मऔविम कडुन व पोलीस खात्याकडुन होत असलेल्या त्रासा बाबत- श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | सदर उद्योजकाच्या सर्व अडचणी मऔविमकडुन सोडविण्यांत आल्या असल्याने विषय वगळण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले. | |
| १८ | लघु उद्योग घटकांना विज बिल हप्त्या हप्त्याने भरणेस सवलत मिळणे बाबत - श्री देवेंद्र राजपत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | या बाबत अ.अ. महावितरण यांनी नियमावलीनुसार कार्यवाही करुन अहवाल सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | अ.अ. महावितरण धुळे |
| ३ | आयत्या वेळचे / नविन विषय | | |
| १ | बंद पडलेल्या कारखान्यास पुर्ववत विज पुरवठा मिळणे बाबत - श्री सुरेश जुगराज मुथा, प्लॉट नं.११/१२/१३ उद्योग नगर सहकारी संस्था लि, धुळे | सदर अर्जदाराने दिनांक २४.०५.२०११ च्या अर्जान्वये बंद पडलेल्या घटकास महावितरण यांनी ९० एचपीचा विजपुरवठा पुर्ववत सुरु करणे बाबत विनंती केलेली आहे. सदर उद्योजकाकडे असलेली पुर्वीची थकबाकी त्यांनी एक रकमी भरणा केल्यास नविन विज पुरवठा करण्याची कार्यवाही तात्काळ केली जाईल असे अ.अ. महावितरण यांनी सांगितले. | अ.अ. महावितरण धुळे |
| २ | मऔविम क्षेत्रात गटारींची व सांडपाण्याची व्यवस्था करणे बाबत - श्री देवेंद्र राजपूत, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती | मऔविम क्षेत्रात गटारींची व्यवस्था मऔविमने करावी तसेच सांडपाणी, पावसाचे पाण्याचा निचरा होण्यासाठी हायवे खालुन अवधान गावा शेजारुन व्यवस्था आहे, परंतु नाल्याची व्यवस्थीत नसल्यामुळे पाणी निचरा होत नाही. या बाबत सविस्तर चर्चा होवुन का.अ. मऔविम यांनी सर्व औ.संघटना / राष्ट्रीय महामार्गाचे प्रतिनिधी यांचे सोबत तपासणी करुन पाण्याच्या निच-यासाठी योग्य ते नियोजन करुन मा.अध्यक्ष यांना अहवाल सादर करावा. | काअ मऔविम धुळे |
| ३ | मऔविम क्षेत्रातील पार्कींग बाबत | मऔविम क्षेत्रात रहदारी वाढल्यामुळे रहदारीस अडथळे येत असल्याचे सर्व औद्योगिक संघटनांनी सांगितले. या बाबत मऔविम यांनी पार्कींगची व्यवस्था करावी तसेच कारखानदारांनी सुध्दा आपल्या कारखान्यात येणा-या वाहनांच्या थांबण्याची व्यवस्था पार्कींगच्या ठिकाणीच केल्यास रहदारीला अडथळा येणार नसल्याचे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | काअ मऔविम धुळे |

मऔविम क्षेत्रात पाणी पुरवठा ज्या दिवशी बंद राहणार आहे, त्याची कल्पना दोन दिवस अगोदर सर्व संघटनांना मऔविमने कळविण्याची व्यवस्था करावी असेही सुचीत करण्यांत आले.

केंद्र शासनाने तांडे तालुका शिरपुर येथील टेक्सटाईल क्लस्टरला पुर्णतः मंजुरी दिली असुन सदर क्लस्टर महाराष्ट्रातील सर्वात कमी वेळात विकसीत झालेले क्लस्टर असल्याचे यावेळी सदस्य सचिव यांनी सांगितले. सदर क्लस्टर विकासासाठी श्री भरत अग्रवाल, सचिव खांदेश जिनप्रेस कारखानदार संघटना यांनी केलेल्या प्रयत्नाबद्यल मा.अध्यक्ष यांचे शुभहस्ते पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यांत आला तसेच त्यांनी आता ऑईल मिल क्लस्टर लवकरात लवकर विकासीत करणेकामी प्रयत्न करावेत असे सर्व औद्योगिक संघटनांनी अपेक्षा व्यक्त केली.

शेवटी मा.अध्यक्ष यांचे व सर्व सदस्यांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले.

सही/-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी धुळे